ePaper
मुख्यमंत्र्यांनी मनोज जरांगे-पाटलांना उपोषणास बसवलं; काँग्रेसचा गंभीर आरोप

| वर्ष - 7 | अंक - 135 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | रविवार, दिनांक 17 सप्टेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews




## आतील पानांत

- आफ्रिकेने ऑस्ट्रेलियाला हरवले!
- शाहरूखच्या जबरा फॅनची कमाल!
- इंडिया आघाडीमुळे सरकार घाबरले!
- आरक्षणात वाटेकरी होऊ देणार नाही!


# कोकणवासीयांसाठी एसटीचे ‘रेडकार्पेट’!

## » गणेशोत्सवाकरिता शहरातून 100 जादा बस : प्रवाशांनी व्यक्त केले समाधान

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गणेशोत्सवासाठी गावी जाणाऱ्या भक्तांना पिंपरी-चिंचवड वल्लभनगर एसटी आगारातून जादा बसची सुविधा देण्यात आली आहे. कोकण विभागासह इतर ठिकाणी एसटी महामंडळाने जादा गाड्या सोडल्या आहेत. महिला तसेच ज्येष्ठ आणि इतरांना देण्यात आलेल्या विविध सुविधांचा फायदा घेत, वल्लभनगर आगारातून कोकणात जाण्यासाठी शनिवार (दि. 16) रोजी तब्बल 100 हून अधिक बुकिंग झालेल्या बस धावणार आहेत.**



गेल्या वर्षी गणेशोत्सवात सुमारे 55 जादा बस कोकण मार्गासाठी बुकिंग झाल्या होत्या. मात्र, या वेळी ही संख्या वाढली आहे. दहा दिवसांपूर्वीच गेल्या वर्षीपेक्षा दुप्पट बसची बुकिंग झाली आहे. या बस चिपळूण, दापोली, देवरुख, गुहागर, खेड, रत्नागिरी, कासे, परचुरी, सावंतवाडी, राजापूर, फौजी आंबवडे या मार्गावर धावणार आहेत. 65 वर्षांवरील ज्येष्ठांना निम्मे तिकिट, तर 75 वर्षांवरील ज्येष्ठांना मोफत प्रवास करता येतो. तसेच 40 ते 45 जणांसाठी ग्रुप बुकिंगची सोय केली आहे.

महिलांसाठी हाफ तिकिटाची योजना सुरू केल्याने महिलांनी देखील मोठ्या प्रमाणात याचा लाभ घेतला असल्याचे आगाराच्या वतीने सांगण्यात आले आहे.

### या संकेतस्थळावर बुकिंग करा...

» गणपती उत्सव म्हणजे कोकणच्या चाकरमान्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा सण आहे. किंबहुना, गणपती बाप्पा , कोकणचा चाकरमानी न एसटी यांचे एक अतुट नाते आहे. त्यामुळे दरवर्षी गणपती उत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांच्या सेवेसाठी एसटी धावत असते. यंदा सुमारे ३१०० जादा गाड्या कोकणातील रस्त्यावर धावतील. बसेस आरक्षणासाठी HTTPS://MSRTC.MAHARASHTRA.GOV.IN या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आल्या असून, सदर बसेसचे आरक्षण बसस्थानकावर किंवा महामंडळाच्या MSRTC MOBILE RESERVATION APP ॲपव्दारे, तसेच खाजगी बुकींग एजंट व त्यांचे ॲपवर उपलब्ध होणार आहे.


---

# शरद पवार गटाच्या शहराध्यक्षपदी तुषार कामठे!

## » प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची घोषणा : अजित पवार यांच्या बालेकिल्ल्यात ‘लक्ष्य’

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाला अखेर शहराध्यक्ष मिळाला असून, बहुप्रतिक्षीत असलेल्या पदावर माजी नगरसेवक तुषार कामठे यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी त्यांना नियुक्ती पत्र दिले.**



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे पद रिक्त होते. त्याजागी माजी आमदार विलास लांडे, कामगार नेते अरुण बोऱ्हाडे आणि काशिनाथ जगताप यांच्या नावाची चर्चा होती. मात्र, शरद पवार गटाकडून युवा चेहऱ्याला संधी देण्यात आली आहे.

प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्याकडून त्यांनी नियुक्तीपत्र घेतले. यावेळी आमदार रोहीत पवार, युवक राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष रविकांत वरपे, विद्यार्थी सेलेचे प्रदेशाध्यक्ष सुनील गव्हाणे, युवकचे शहराध्यक्ष इम्रान शेख आदी उपस्थित होते.

२०१७ मध्ये झालेल्या महापालिका सार्वत्रिक निवडणुकीमध्ये तुषार कामठे यांनी भारतीय जनता पार्टीकडून तिकीट घेतले होते. भाजपाच्या तिकीटावर त्यांनी पिंपळे निलख प्रभागातून निवडणूक जिंकली होती. महापालिकेतील सत्ताकाळात त्यांचे भाजपाच्या स्थानिक नेतृत्वाशी मतभेद होते. त्यामुळे नगरसेवकपदाचा कार्यकाळ संपण्यापूर्वीच महाविकास आघाडी सत्ताकाळातील तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीमध्ये राष्ट्रवादीत प्रवेश केला होता.

### भाजपा, अजित पवार गटाविरोधात मोहीम उघडणार...

» दरम्यान, अजित पवार यांनी भाजपा- शिवसेना युती सरकारमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे राष्ट्रवादीत दोन गट पडले होते. राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी अजित पवार यांच्यासोबत राहण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे शरद पवार गटाचे शहराध्यक्षपद रिक्त होते. तुषार कामठे यांनी शहराध्यक्षपदी जबाबदारी स्वीकारली असून, आगामी काळात भाजपाचे शहराध्यक्ष शंकर जगताप, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांच्याविरोधात कामठे मोहीम उघडणार आहेत, असे चित्र आहे. तसेच, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बालेकिल्ल्यात आता प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी लक्ष घातले आहे, यावर शिक्कामोर्तब झाले आहे.

# साखर उद्योग आपला ठसा उमटवेल!

## पुण्यात एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**साखर उद्योग हा भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मजबूत कणा असून ग्रामीण जनतेच्या सामाजिक आणि आर्थिक उन्नतीमध्ये त्याने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. इथेनॉल, बायो-सीएनजी आणि हायड्रोजन हे भारताच्या अक्षय्य ऊर्जा कार्यक्रमातील नवीन क्षीतिजे असून त्यांचा वापर करण्याची उपजत क्षमता साखर उद्योगात आहे.**

त्यामुळे भारताच्या अक्षय ऊर्जा अभियानाला गती देऊन सक्षम ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या उभारणीत साखर उद्योग आपला ठसा उमटवेल, असा विश्वास कोजनरेशन असोसिएशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष, ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांनी व्यक्त केला. कोजनरेशन असोसिएशन ऑफ इंडियातर्फे आयोजित ‘साखर कारखाना संकुलांच्या हरित आणि अक्षय्य उर्जेसाठी एकात्मिक धोरण’ या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन आणि राष्ट्रीय कोजनरेशन पुरस्कारांचे वितरण शरद पवार यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते.



याप्रसंगी व्यासपीठावर कोजनरेशन असोसिएशन ऑफ इंडियाचे महासंचालक संजय खताळ, दूधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष के.पी. पाटील, पी.आर. पाटील, ऑइल अँड नॅचरल गॅस कॉर्पोरेशन लिमिटेडचे माजी चेअरमन आणि कार्यकारी संचालक सुभाष कुमार, बायोमासचे सहसचिव डी. डी. जगदाळे, शरद पवार, कोजन इंडियाचे उपाध्यक्ष जयप्रकाश दांडेगावकर, नॅशनल शुगर इन्स्टिट्यूटचे संचालक नरेंद्र मोहन, विस्मा अर्थात वेस्ट इंडियन शुगर मिल असोसिएशनचे अध्यक्ष व्ही.व्ही. ठोंबरे,हायड्रोजन असोसिएशन ऑफ इंडियाचे वरिष्ठ उपाध्यक्ष आणि इंडियन ऑईल कॉर्पोरेशनच्या संशोधन आणि विकास विभागाचे माजी संचालक डॉ. एस. एस. व्ही. रामकुमार आणि रेणुका शुगर्सचे कार्यकारी संचालक रवी गुप्ता आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना शरद पवार म्हणाले की, साखर उद्योगामुळे ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांमध्ये चांगले रस्ते आणि सिंचन सुविधांद्वारे महत्त्वपूर्ण बदल घडवून आणले आहेत. आर्थिक व्यवस्था, वैद्यकीय सुविधा, वाहतूक आणि इतर अनेक सेवा क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्यात साखर उद्योगाचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. जगातील 80% ऊर्जा संसाधनांचा समावेश असलेले जीवाश्म इंधन हे ग्लोबल वार्मिंगचे प्रमुख कारण आहे जे मानवजातीसाठी सर्वात मोठा धोका आहे. जगभरातील सरकारांनी हे एक आव्हान म्हणून स्वीकारले असले तरी त्यावरील उपायांबद्दल धोरण निश्चिती करणे आवश्यक आहे. भारत सरकारने देखील 1980 पासून यासंदर्भात अभियान सुरू केले होते आणि आताचे विद्यमान नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय अधिक ताकद आणि तत्परतेने आपली जबाबदारी पार पाडत आहे.'अन्न सुरक्षा' आणि 'ऊर्जा सुरक्षा' या दोन्ही गोष्टी हातात हात घालून कशा पुढे जातील, याविषयी खबरदारी घेणे आवश्यक आहे. भारत हा जगातील तिसरा सर्वात मोठा वीज उत्पादक आणि वीज ग्राहक देश आहे. सरकारने नवीन हायड्रोजन धोरण जाहीर केले असून त्यामध्ये 2029-30 पर्यंतच्या पाच वर्षांच्या कालावधीसाठी 19744 कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे.

### जीवाश्म इंधन हे ग्लोबल वार्मिंगचे कारण

» साखर उद्योगामुळे ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांमध्ये चांगले रस्ते आणि सिंचन सुविधांद्वारे महत्त्वपूर्ण बदल घडवून आणले आहेत. आर्थिक व्यवस्था, वैद्यकीय सुविधा, वाहतूक आणि इतर अनेक सेवा क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्यात साखर उद्योगाचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. जगातील 80% ऊर्जा संसाधनांचा समावेश असलेले जीवाश्म इंधन हे ग्लोबल वार्मिंगचे प्रमुख कारण आहे जे मानवजातीसाठी सर्वात मोठा धोका आहे. जगभरातील सरकारांनी हे एक आव्हान म्हणून स्वीकारले असले तरी त्यावरील उपायांबद्दल धोरण निश्चिती करणे आवश्यक आहे. भारत सरकारने देखील 1980 पासून यासंदर्भात अभियान सुरू केले होते आणि आताचे विद्यमान नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय अधिक ताकद आणि तत्परतेने आपली जबाबदारी पार पाडत आहे.

# भारत देशाला सामाजिक आणि राजकीय परंपरा!

## देशाचे नाव भारत हेच राहिले पाहिजे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**देशाचे नाव हे भारत हेच राहिले पाहिजे. इतर कोणत्या देशाचे दोन नाव नाही. भारताला प्रेरणादायी इतिहास आहे, देशाला सामाजिक आणि राजकीय परंपरा आहे. त्यामुळे देशाचे नाव भारत हेच हवे याबाबत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अखिल भारतीय समन्वय समितीमध्ये चर्चा झाली. देशाचे नाव भारत हेच राहिले पाहिजे, ही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची भूमिका असल्याची माहिती सहसरकार्यवाह डॉ मनमोहन वैद्य यांनी शनिवारी दिली.**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अखिल भारतीय समन्वय समितीची बैठक गेल्या तीन दिवसांपासून स. प. महाविद्यालय येथे सुरू आहे. देशभरातील ३६ संघटनाचे २६७ प्रतिनिधी यामध्ये सहभागी झाले होते. तीन दिवसांच्या बैठकीत नेमके काय घडले याची माहिती डॉ. मनमोहन वैद्य यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत दिली. प्रचारक सुनील आंबेकर या वेळी उपस्थित होते. डॉ. वैद्य म्हणाले, संघ कार्यामध्ये महिलांचा सहभाग वाढावा यासाठी विचार करण्यात आला. विविध क्षेत्रात कार्यरत महिलांचा सहभाग वाढविण्याच्या उद्देशातून विभाग स्तरावर महिला संमेलनांचे आयोजन करण्यात येत आहे. महिला संपर्काच्या माध्यमातून ऑगस्टपासून जानेवारीपर्यंत देशात ४११ महिला संमेलनांचे आयोजन करण्यात येणार आहे. आतापर्यंत १२ प्रांतांमध्ये ७३ ठिकाणी महिला संमेलन झाले असून त्यामध्ये एक लाख 23 हजार महिला सहभागी झाल्या आहेत. संघ संपर्कात येणाऱ्या नव्या लोकांना संघाचे काम समजण्यासाठी संघ परिचय वर्ग घेतले जातील. संघ कार्य वाढत असून समाजाचा संघाच्या कार्यामध्ये सहभाग वाढत आहे. संघ समाजात सांस्कृतिक काम करत आहे. देश विरोधी शक्ती कमी होत असून देशाला पुढे नेणारी शक्तीचे काम वाढत आहे. मणिपूरमध्ये झालेला हिंसाचार आणि तेथील अशांत परिस्थिती यावर चर्चा करण्यात आली. ही स्थिती चिंताजनक असून यामध्ये तेथील सरकारने निर्णय घेणे अपेक्षित असल्याची भूमिका बैठकीत मांडण्यात आली. दोन समाजातील वाद मिटवण्यासाठी संघ कार्यकर्ते काम करत आहे, याकडे वैद्य यांनी लक्ष वेधले. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांना अनेक वर्ष समाजाने बाजूला ठेवले आहे. त्यांना आरक्षण देऊन समाजाच्या मुख्य प्रवाहात आणले जावे ही संघाची भूमिका असल्याचे वैद्य यांनी स्पष्ट केले. अयोध्या येथील श्रीराम मंदिरामध्ये प्राणप्रतिष्ठापना जानेवारीत मकर संक्रातीनंतर मुहूर्तावर करण्यात येणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.



### ते तुम्ही नड्डांना विचारा

» २०२४ च्या निवडणुकीसंदर्भात भारतीय जनता पक्षाच्या वतीने नेमकी काय मांडणी करण्यात आली, असे विचारले असता ‘हा संघाचा विषय नाही. काय मांडणी केली ते तुम्ही जे. पी. नड्डा यांनाच विचारा’, असे डॉ. मनमोहन वैद्य यांनी सांगितले. केंद्र सरकारला काही सूचना करण्यात आल्या आहेत का, या प्रश्नावर ‘सरकारला काही सांगण्याचे हे व्यासपीठ नव्हते’, असे वैद्य यांनी स्पष्ट केले. सरकारच्या कामगिरीविषयी संघ समाधानी आहे, या प्रश्नाला वैद्य यांनी थेट उत्तर दिले नाही. मात्र, देशात सत्ता परिवर्तन झाल्यानंतर १८ मे २०१४ च्या संडे गार्डियनच्या संपादकीयमध्ये ‘ब्रिटिश फायनली रुल्ड आऊट‘ असे प्रसिद्ध झाले होते, हा दाखला वैद्य यांनी दिला.

## लक्ष्मणभाऊंचा अध्यात्मिक वारसा

# शंकरभाऊंनी सक्षमपणे जपला!

### शिव महापुराण कथा सोहळ्यात सहभागी राज्यभरातील भाविकांच्या भावना









## सुमारे 2 लाख भाविकांची गर्दी...

महाराष्ट्रातील सर्वात मोठा शिव महापुराण कथा सोहळा असलेल्या या अध्यात्मिक पर्वातील दुसऱ्या दिवशी देखील या कथेचे श्रवण करण्यासाठी मोठी गर्दी उसळली होती. सुमारे दोन लाख भाविक कथेचा आस्वाद घेताना मंत्रमुग्ध झाले. यावेळी सभामंडपाच्या बाहेर बसून अनेक भाविकांनी कथा ऐकली. वाहतूक पोलीस प्रशासन आणि सुरक्षा व्यवस्था आणि आयोजक कमिटीची दक्षता यामुळे एव्हढ्या प्रचंड प्रमाणात झालेल्या गर्दीतही कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. लाखो भाविक ज्ञानप्राप्ती केल्याचे समाधान घेवून परताताना दिसत होते.

## पीडब्ल्यूडी मैदान सांगवी येथील अध्यात्मिक सोहळ्याला तुफान गर्दी

।पिंपरी ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहराचे लोकनेते स्वर्गीय आमदार लक्ष्मण जगताप यांचा अध्यात्मिक व सामाजिक वारसा त्यांचे बंधू शंकर जगताप यांनी सक्षमपणे जपला आहे. सांगवीतील पीडब्ल्यूडी मैदानावरील विराट गर्दी म्हणजे "लक्ष्मणभाऊं'च्या माघारी शंकरभाऊंनी जपलेल्या यशस्वी जबाबदारीची पोहोच पावती आहे, अशा भावना श्री अष्ठविनायक शिव महापुराण कथा वाचन सोहळ्यात राज्याच्या कानाकोपऱ्यातून सहभागी झालेल्या भाविकांकडून व्यक्त होत आहेत.**



लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप मित्र परिवार यांच्या वतीने आयोजित श्री अष्टविनायक शिव महापुराण कथेचे आयोजन वतीने पीडब्ल्यूडी मैदान, नवी सांगवी येथे करण्यात आले आहे. या कथेचा आज दुसरा दिवस होता. शनिवार आणि रविवार असा सुट्टीचा दिवस असल्यामुळे साधक, भाविक आणि शिवभक्तांसह सर्वसामान्य नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी शिव महापुराण आणि त्याचे महात्म विशद करताना आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कथा वाचक पंडित प्रदीप मिश्रा म्हणाले की, ' मनात संशय असताना एखादी गोष्ट करण्याचा प्रयत्न केल्यास अपेक्षित यश मिळत नाही. म्हणून एखादी गोष्ट निशःयपणे केल्यास मिलाणारे यश हे सुखावणारे असते. याच प्रमाणे भगवान शंकरावर विश्वास ठेवून त्यांची भक्ती केल्यास निश्चित यश मिळते'. शंकर, पार्वती, कृष्ण ही सर्व परमेश्वाराचीच रुपे आहेत. यांची ध्यानधारणा केल्यानंतर त्याचे पुण्य आपल्याला लाभते. त्यामुळे निस्पृहपणे ध्यानधारणा करावी, असा मोलाचा सल्ला पं. प्रदीप मिश्रा यांनी यावेळी बोलताना दिला.

## दरवर्षी हा सोहळा घेण्याचे भाविकांकडून आवाहन

यावर्षी प्रथमच लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप मित्र परिवाराच्या वतीने श्री अष्टविनायक शिव महापुराण कथा सोहळयाचे आयोजन करण्यात आले आहे. आज पं. प्रदीप मिश्रा यांच्या वतीने भाविकांकडून आलेल्या पत्रांचे वाचन करण्यात आले. यामध्ये भाविकांनी या कार्यक्रमाचे मुख्य निमंत्रक शंकर जगताप यांना 'श्री अष्टविनायक शिव महापुराण कथे'चा सोहळा दरवर्षी घेण्याचे आवाहन केले. पं. प्रदीप मिश्रा यांनी हे पत्र वाचून दाखवितानाच भाविकाने केलेल्या आवाहनाला उपस्थितांनी भरघोस प्रतिसाद दिला. पंडित मिश्रांनी जगताप कुटुंबियांच्या अध्यात्मिक व धार्मिक कार्याचे कौतूक केले.




# खेळी खेळिया : एक वर्तुळ पूर्ण झाले..

**जर्मन अर्थव्यवस्थेतील मरगळ आणि त्या देशाच्या पुरुष फुटबॉल संघाच्या घसरणीची तुलना करण्याचा मोह बऱ्याचदा इंग्लिश माध्यमांना (म्हणजे प्राधान्याने ब्रिटिश, काही अमेरिकन) आवरत नाही. 'सिक मॅन ऑफ युरो' असा जर्मनीचा उल्लेख 'दि इकॉनॉमिस्ट'ने गतशतकाच्या अखेरीस केला होता. त्या वेळी जर्मन फुटबॉल संघाची कामगिरीही उदासीन बनली होती.**



पाठोपाठच्या दोन विश्वचषक स्पर्धामध्ये उपान्त्यपूर्व फेरीत गाशा गुंडाळावा लागणे ही बाब तेव्हाच्या जर्मन संघाबाबत तिथल्या फुटबॉलरसिकांच्या पचनी पडण्यासारखी नव्हती. कारण त्याआधीच्या तीन स्पर्धांमध्ये जर्मनीचा फुटबॉल संघ अंतिम फेरीत पोहोचला होता नि १९९०मध्ये जगज्जेताही ठरला होता. युरोपमधील सर्वात मोठी अर्थव्यवस्था आणि युरोपातील सर्वात यशस्वी फुटबॉल संघ असलेल्या जर्मनीसाठी दोन पायऱ्या खाली येणे म्हणजे २० पायऱ्या घसरल्यासारखे असते. अर्थव्यवस्था मंदावण्याची कारणे अनेक आहेत, त्यांतील काही (उदा. कोविड, रशियन आक्रमण, चीनसारख्या आणखी एका मोठ्या अर्थव्यवस्थेशी असलेल्या संलग्नतेचा फटका) बाह्यघटकांवर आधारित असून, ती सर्वस्वी जर्मन धोरणकर्त्यांच्या हातात नाहीत. पण जर्मन फुटबॉलच्या बाबतीत तेथील संघटनेला अशी पळवाट शोधता येणार नाही. २५ वर्षांपूर्वीची घसरण उदात्त भासावी, अशी सध्या त्यांच्या फुटबॉल संघाची दशा आहे. पुढील वर्षी युरो चषक फुटबॉल स्पर्धा जर्मनीत आहे. त्यामुळे यजमान म्हणून या स्पर्धेत जर्मनीला थेट प्रवेश मिळेल. अन्यथा काही खरे नव्हते. ही स्पर्धा जर्मनीऐवजी इतर कुठे असती, तर जर्मनीला पात्रता फेऱ्या खेळाव्या लागल्या असत्या. त्यांची सध्याची कामगिरी पाहता, त्या फेऱ्यांमध्ये काहीतरी बरेवाईट होऊन, युरोचे तिकीटच हुकण्याची शक्यता नाकारता आली नसती. हान्सी फ्लिक या त्यांच्या प्रशिक्षकांना नुकताच नारळ देण्यात आला. जर्मन फुटबॉलच्या इतिहासात राष्ट्रीय संघाच्या प्रशिक्षकाच्या हकालपट्टीची ही पहिलीच वेळ. हा संघ आणखी किती खाली जाऊ शकतो याविषयी अंदाज बांधणेही जर्मन फुटबॉलच्या चाहत्यांनी सोडून दिले आहे. जर्मनीचा बास्केटबॉल संघ फिलिपिन्समध्ये बास्केटबॉल विश्वचषकाच्या अंतिम फेरीत सर्बियाविरुद्ध झुंजत होता, तो सामना संपायच्या काही क्षण आधी जर्मन फुटबॉल संघटनेने इकडे जर्मनीमध्ये फ्लिक यांच्या हकालपट्टीची घोषणा केली. जर्मन बास्केटबॉलपटू अंतिम सामना जिंकून जगज्जेते ठरले, पण इकडे चर्चा सुरू झाली फ्लिक यांच्या हकालपट्टीची. अनेक जर्मनांना या मुजोरीचा राग आला. फुटबॉलने आपले मनोविश्व किती विषम प्रमाणात व्यापले आहे याची जाणीव यांतील काहींना झाली. जर्मन फुटबॉलचा ऱ्हास झालेला आहे, हे वास्तव स्वीकारण्याची वेळ आली असल्याची जाणीव त्यांना झाली. पण हे वास्तव अलीकडचे नाही. २५ वर्षांपूर्वी विशेषत: नव्या दमाच्या पूर्व युरोपीय संघांसमोर जर्मन संघ हतबल ठरू लागला होता. विश्वचषक १९९८ मध्ये त्यांना त्या वेळी नव्यानेच स्वतंत्र झालेल्या क्रोएशियाने हादरवले. पुढे युरो स्पर्धेत रोमानिया, चेक प्रजासत्ताक हे संघही जर्मनीला हरवू लागले. सध्या पूर्व युरोपीय संघांची जागा आशियाई संघांनी घेतली आहे. विश्वचषक २०१८ मध्ये दक्षिण कोरिया (या स्पर्धेत जर्मनी मेक्सिकोशीदेखील हरले) आणि विश्वचषक २०२२ मध्ये जपान या आशियाई संघांविरुद्ध झालेले पराभव जर्मन संघ साखळीतच गारद होण्यास कारणीभूत ठरले. अशा प्रकारे सलग दोन स्पर्धांमध्ये नामुष्की जर्मन संघावर इतिहासात कधीही ओढवली नव्हती. २०१४ मध्ये जर्मन संघ जगज्जेता ठरला होता, पण यानंतर घसरण सुरूच आहे. २०२१ पर्यंत जोकीम ल्योव यांच्याकडे प्रशिक्षकपदाची जबाबदारी होती. ते जवळजवळ १५ वर्षे जर्मनीचे प्रशिक्षक होते. २५ वर्षांपूर्वीच्या जर्मन संघात ऊर्जा फुंकण्याचे श्रेय युर्गन क्लिन्समान यांना दिले जाते. ल्योव हे क्लिन्समान यांचे सहायक. ल्योव यांच्या कारकीर्दीत जर्मनीने अभूतपूर्व प्रगती केली होती. त्याला समांतर कामगिरी स्पेनची झाली नसती, तर एकापेक्षा अधिक जगज्जेतेपदे जर्मनीच्या पारड्यात नक्की आली असती. पण ल्योव यांची एक शैली होती. त्या शैलीचा ताजेपणा काही वर्षांनी सरला. ल्योव यांनी क्लिन्समान यांच्या शैलीत सुधारणा केली. ल्योव यांचे सहायक फ्लिक यांना तसे करून दाखवता आले नाही. २००८ ते २०१४ या काळात फ्लिक ल्योव यांचे सहायक होते. मध्यंतरी म्हणजे २०१९च्या आसपास ते बायर्न म्युनिचचे प्रशिक्षक होते आणि त्यांनी बायर्नला चॅम्पियन्स लीगसह तीन अजिंक्यपदे मिळवून दिली.

## संपादकीय »

### धर्म संकट!

***एखाद्याने सनातन धर्माचा स्वीकार करून त्याप्रमाणे जगायचे असे ठरले तर आजच्या काळात त्याने नेमके काय करायचे, हा सांप्रती सामान्य माणसाला पडलेला गंभीर प्रश्न..***

धर्म या गोष्टीने आपल्या समाजाचे काय त्रांगडे करून ठेवले आहे, हे वर्तमान संदर्भात समजून घ्यायचे असेल तर सध्याचा सनातन धर्मावरून सुरू असलेला वाद त्यासाठी पुरेसा आहे. तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांचे पुत्र, मंत्री आणि अभिनेते असलेल्या उदयनिधी स्टॅलिन यांनी सनातन धर्मविषयी केलेल्या वक्तव्याने उठलेले हे वादळ निवडणुकीपर्यंत घुमवले जाणार हे सांगायला कुणा ज्योतिषाची गरज नाही. आपल्याला डेंग्यू, मलेरिया आणि त्यांचे परिणाम तर नको आहेत, हे उघडच आहे. याचेही उत्तर देता येत नाही कारण त्यासाठी सनातन धर्म म्हणजे काय हे तरी आपल्याला कोठे माहीत!. हा सनातन धर्म नक्की कोणती तत्त्वे सांगतो आणि त्याचे पालन करायचे म्हणजे नेमके काय करायचे? तो हिंदू धर्माचाच भाग आहे की त्यापेक्षा वेगळा हे शोधण्याचा हा पामर प्रयत्न.

**देशातील पगारदार नोकरांची अग्रगण्य समजली जाणारी, ७२ हजार सभासद, व राज्यभरात ५० शाखा तसेच ११ विस्तार केंद्रे असलेली स्टेट ट्रान्सपोर्ट को – ऑप बँक या एसटी कर्मचाऱ्यांच्या बँकेत नुकते सत्तांतर होऊन नवीन संचालक मंडळ अस्तित्वात आले आहे. या संचालक मंडळाने बँकेची नीट माहिती समजून न घेता पहिल्याच बैठकीत काही निर्णय घेतले.**

# नवीन संचालक मंडळ आल्यानंतर एसटी संभ्रमात?

यावर समाजमाध्यमे, वृत्तपत्रात उलटसुलट चर्चा सुरू झाली आणि सभासद, ठेवीदारांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. याचा परिणाम म्हणून ठेवीदारांनी २२५ कोटी रुपयांच्या ठेवी काढल्या असल्याचे समजते. ठेवी काढणाऱ्यांची संख्याही वाढते आहे. सभासद, ठेवीदारांमध्ये संभ्रमावस्था असताना बँक प्रशासनाने कोणतेही खुलासा न करणे हे आश्चर्यकारक आहे. हा संभ्रम वेळेत दूर न झाल्यास बँकेसाठी ही धोक्याची घंटा आहे. एसटी बँकेत एकूण २३०० कोटी रुपयांच्या ठेवी असून त्यातील आतापर्यंत २२५ कोटी रुपयांच्या ठेवी काढण्यात आलेल्या आहेत. ठेवी काढणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढते आहे ही गंभीर बाब आहे. त्यामुळे दैनंदिन व्यवहार करण्यात अडचणी येतात. बँकेने व्यवसायाचा भाग म्हणून विविध वित्तीय संस्थेत केलेली गुंतवणूक दैनंदिन व्यवहारासाठी व क्लिअरिंगसाठी तोडावी लागली असल्याचे भयाण वास्तव



समोर आले आहे. आतापर्यंत अंदाजे १०० कोटी रुपयांची गुंतवणूक तोडली असल्याचे समजते. कुठल्याही बँकेचा गुंतवणूक हाच मुख्य गाभा असतो. त्यातूनच बँकिंग व्यवसाय चालतो, पण एसटी बँकेच्या दैदिप्यमान ७० वर्षांच्या कारकिर्दीत पहिल्यांदा या व्यावसायिक धोरणालाच तडा गेला आहे. त्यामुळे आता भविष्यात बँक अडचणीत सापडते की काय, असा प्रश्न उपस्थित केला जातो आहे. सत्तापरिवर्तन हे लोकशाही पद्धतीने झाले असल्याने त्याला हरकत असण्याचे कारण नाही. पण संचालक मंडळाच्या पहिल्याच बैठकीत काही निर्णय घेतले. याबाबत माध्यमात उलटसुलट चर्चा झाली. त्याने सभासद, ठेवीदारांमध्ये संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. त्याचा परिणाम म्हणून साधारण २२५ कोटी रुपयांच्या ठेवी ठेवीदारांनी काढल्या असल्याचे समजते. खरे तर अशी उलटसुलट चर्चा सुरू झाल्यावर अशा चर्चेवर बँकेकडून खुलासा करणे आवश्यक होते. मात्र त्याऐवजी नव्या संचालक मंडळाच्या पॅनल प्रमुखांनी बँकेत अवैद्य मार्गाने जमवलेली रक्कम ठेवी म्हणून ठेवली असल्याची शंका घेत त्याची चौकशी करणार असल्याचे वादग्रस्त विधान केले. त्यानंतर आणखी संभ्रम वाढला. ठेवी काढणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. ही बाब बँकेसाठी धोक्याची घंटा ठरू शकते. खरे तर या बँकेने आमच्यासारख्या अनेक सभासदांना खूप काही दिले आहे. एसटी महामंडळातील कमी वेतन असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी वरदान ठरलेल्या या बँकेबाबतीत अशी चर्चा होणे व त्यावर कुठलाही ठोस निर्णय घेऊन खुलासा नोंदविण्यासाठी बँकेने पुढाकार न घेणे हे बँकेच्या भवितव्यासाठी नक्कीच परवडणारे नाही.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# ओबीसींच्या आरक्षणात आम्ही कुणालाही वाटेकरी होऊ देणार नाही!

## ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागू देणार नाही : देवेंद्र फडणवीस

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा समाजाला आरक्षण द्यायचं असेल तर ओबीसी आरक्षणाला धक्का लावू नका, अशी आक्रमक भूमिका ओबीसी समाजाने घेतली आहे. त्यासाठी विविध आंदोलनंही करण्यात येत आहेत. आज छत्रपती संभाजी नगरमध्येही आंदोलन करण्यात आले तसेच नागपूरमध्येही आंदोलन करण्यात येत आहे. दरम्यान, याबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वाचे विधान केले आहे.**

ते म्हणाले की, ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागू देणार नाही, असे विधान त्यांनी केले. राज्य सरकारची ही भूमिका आहे की ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागू देणार नाही. ओबीसींचं आरक्षण आम्ही कमी होऊ देणार नाही. कुणालाही त्यात वाटेकरी होऊ देणार नाही अशी स्पष्ट भूमिका राज्य सरकारने घेतली आहे. त्यामुळे ओबीसी बांधवांना आमची विनंती आहे. त्यांनी जे काही आंदोलन सुरु केलेले आहे ते मागे घ्यावं, कुठल्याही प्रकारचे आंदोलन त्यांनी करु नये, आज मी संभाजीनगरमध्ये गेलो होतो तिथल्या ओबीसी आंदोलकांचीही भेट घेतली. त्यांनाही मी आंदोलन मागे घेण्याची विनंती केली आहे. माझा विश्वास आहे की ते आंदोलन मागे घेतील. नागपूर आणि चंद्रपूर या ठिकाणी आंदोलनाला बसलेल्या आंदोलकांनाही मी विनंती करणार आहे, असे फडणवीस यांनी म्हटलं आहे. राज्यात लवकरच ओबीसी समाजाची वसतिगृहे सुरु होणार असल्याची माहिती देखील यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. त्यासाठी अर्थ मंत्रालयाची



देखील परवानगी मिळाली असून राज्यात 72 ओबीसी वसतिगृह उभारण्यात येणार असल्याचं फडणवीसांनी सांगितले. पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत दहा लाख घरांची तरतूद ही ओबीसी समाजासाठी करण्यात आली असून त्यातील तीन लाख घरांचे बांधकाम सुरु केले जाणार आहे. कंत्राटी भरतीच्या मुद्द्यावर देखील फडणवीसांनी यावेळी भाष्य केलं. यावर बोलतांना त्यांनी म्हटलं की, सरकारच्या आस्थापन जागेवर कोणतीही कंत्राटी भरती होणार नाही. कंत्राटी भरती या अफवांवर विश्वास ठेवू नये. तर वर्षात 75 हजार नाही तर दीड लाख नोकरभरती करण्याची घोषणा देखील फडणवीसांनी केली आहे. तसचे लवकरच ओबीसी शिष्टमंडळाला चर्चेला बोलवण्यात येणार असल्याचं फडणवीसांनी सांगितलंय. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी उपोषण सुरु केलं होतं. त्यांचं उपोषण दोन दिवसांपूर्वी मागे घेण्यात आले आहे. मात्र त्यावेळी कुणबी-मराठा, मराठा-कुणबी असं प्रमाणपत्र देण्यात येईल असं आश्वासन देण्यात आले आहे. उपोषण मागे घेतलं असलं तरीही आंदोलन मागे घेणार नाही असेही त्यांनी म्हटले आहे. त्यांना मराठा आरक्षण देणार हे आश्वासन देण्यात आले आहे.

### ओबीसी वसतिगृह तयार करु

» राज्यात लवकरच ओबीसी समाजाची वसतिगृहे सुरु होणार असल्याची माहिती देखील यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. त्यासाठी अर्थ मंत्रालयाची देखील परवानगी मिळाली असून राज्यात 72 ओबीसी वसतिगृह उभारण्यात येणार असल्याचं फडणवीसांनी सांगितले. पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत दहा लाख घरांची तरतूद ही ओबीसी समाजासाठी करण्यात आली असून त्यातील तीन लाख घरांचे बांधकाम सुरु केले जाणार आहे.

### 'कंत्राटीच्या अफवांवर विश्वास ठेवू नये'

» कंत्राटी भरतीच्या मुद्द्यावर देखील फडणवीसांनी यावेळी भाष्य केलं. यावर बोलतांना त्यांनी म्हटलं की, सरकारच्या आस्थापन जागेवर कोणतीही कंत्राटी भरती होणार नाही. कंत्राटी भरती या अफवांवर विश्वास ठेवू नये. तर वर्षात 75 हजार नाही तर दीड लाख नोकरभरती करण्याची घोषणा देखील फडणवीसांनी केली आहे. तसचे लवकरच ओबीसी शिष्टमंडळाला चर्चेला बोलवण्यात येणार असल्याचं फडणवीसांनी सांगितलंय.

ओबीसी समाजाने आंदोलन सुरु केलेले आहे. ओबीसी समाजाच्या आरक्षणातून स्वतंत्र आरक्षण दिलं तर आम्ही सहन करणार नाही. नेमकं काय सांगून उपोषण मागे घेण्यात आलं आहे हे आम्हाला माहित नाही असं आंदोलनकर्त्यांनी म्हटलं आहे. आता त्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी आश्वासन दिलं आहे की ओबीसी आरक्षणात कुठलाही वाटेकरी नसेल. तसंच ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागू देणार नसल्याचंही म्हटलं आहे.

# शासन आपल्या दारी, पैसे उधळतंय वाऱ्यावरी

## मोर्चेकरी दारावरी, सरकार झाडतेय बंदोबस्ताच्या फैरी : राष्ट्रवादी कॉंग्रेस

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज

**हे सरकार सर्वसामान्यांसाठी आहे...म्हणत महायुतीचे सरकार असंवैधानिकरित्या सत्तेत आले. ट्रीपल इंजिन सरकार अधिक वेगाने सर्वसामान्यांसाठी काम करेल... असे म्हणू लागले. परंतु हे ट्रीपल इंजिन सर्वसामान्यांच्या दारी न जाता स्वतःचाच राजकीय स्वार्थ साधण्यासाठी दिल्लीच्या दिशेने धावू लागलं आणि सर्वसामान्यांच्या आशा धुळीस मिळवल्या गेल्या आहेत.**

अशी टीका राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून करण्यात आली आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसने फेसबुकवर पोस्ट करत राज्या सरकारवर हल्लाबोल केला आहे. इथला शेतकरी, कष्टकरी, असंघटीत कामगार, महिला व युवा या सर्वांच्या स्वप्नांवर कुऱ्हाड चालवण्याचे काम महायुती सरकारने केले. धार्मिक व जातीयवादाच्या विळख्यात अडकलेल्या महायुती सरकारने विकासकामांऐवजी सत्ताकारणालाच प्राधान्य दिले. परंतु आज महाराष्ट्रातील जनता आपल्यावर झालेल्या अन्यायाविरोधात आवाज उठवू लागली की, दंडुकेशाहीच्या



आधारावर पोलिसांचे भय दाखवण्याचे काम राज्य सरकार करू लागल्याचे मराठवाड्यात आयोजित करण्यात आलेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीवरून स्पष्ट झाले आहे. मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या पार्श्वभूमीवर दोन दिवसीय मंत्रिमंडळ बैठक औरंगाबादमध्ये पार पडत आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसने फेसबूकवर पोस्ट करत म्हटले आहे की, कष्टकऱ्या महाराष्ट्राच्या घामातून उभे राहिलेले करररूपी पैसे खर्च करून राज्य सरकारने औरंगाबादमध्ये मंत्रिमंडळ बैठकीचे आयोजन केले.

### राज्याच्या गृहमंत्र्यांची लाठीचार्ज संस्कृती

» राष्ट्रवादी कॉंग्रेसने फेसबूकवर पोस्ट करत म्हटले आहे की, दोन दिवसाच्या मंत्रिमंडळ बैठकीसाठी औरंगाबादमध्ये आयपीएस दर्जाचे 6 वरिष्ठ पोलिस अधिकारी, पोलिस उपायुक्त दर्जाचे 23 पोलिस अधिकारी, 115 पोलिस निरीक्षक, 296 पीएसआय, 1700 पोलिस, 147 महिला पोलिस, एसआरपीएफच्या 4 तुकड्या, होमगार्ड 500 असे एकूण 3 हजार पोलिस संपूर्ण शहरात तैनात आहेत.

परंतु हे आयोजन, त्यातील घोषणा या आगामी काळातील निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जनमत आपल्या बाजूने वळवण्यासाठीच असल्याचे संपूर्ण महाराष्ट्राला कळून चुकलेले आहे. मराठवाड्याच्या हिताचे निर्णय दोन दिवसीय मंत्रिमंडळ बैठकीत घेऊ तसेच मराठवाड्यातील जनता आमची आहे. असे म्हणणाऱ्या मुख्यमंत्र्यांना जर मराठवाड्यातील जनतेविषयी इतकाच कळवळा असता तर त्याच मराठवाड्यातील औरंगाबादला छावणीचे स्वरूप का आणले गेले.

# इंडिया आघाडीमुळे सरकार घाबरले!

## » मोदी पूर्णपणे अपयशी; विरोधी पक्षांविरोधात कारवाई

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**काँग्रेस कार्यकारिणीची (CWC) बैठक शनिवारी 16 सप्टेंबर रोजी हैदराबादमध्ये सुरू झाली. गेल्या महिन्यात नवीन CWC स्थापन झाल्यानंतर ही पहिलीच बैठक आहे. त्यात काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे म्हणाले की, महागाई, बेरोजगारी, मणिपूर हिंसाचार आणि विषमता रोखण्याच्या मुद्द्यांवर मोदी सरकार पूर्णपणे अपयशी ठरत आहे..**




इंडिया आघाडीला ज्याप्रमाणे यश मिळत आहे, त्याचप्रमाणे भाजप सरकार विरोधी पक्षांवर कारवाई करण्यात व्यस्त आहे, असेही खरगे म्हणाले. संसदेत विरोधकांचा आवाज दडपल्याचा आम्ही निषेध करतो. काँग्रेस अध्यक्ष म्हणाले की, अलीकडील हिंसक घटनांमुळे भारताच्या आधुनिक, पुरोगामी आणि धर्मनिरपेक्ष प्रतिमेला धक्का बसला आहे. भाजप आगीत तेल ओतत आहे. या दोन दिवसीय बैठकीत आगामी पाच राज्यांमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकांबाबत अनेक टप्प्यांत चर्चा होणार आहे. या बैठकीत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्षा सोनिया गांधी, काँग्रेस खासदार राहुल गांधी, प्रियंका गांधी, राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत, छत्तीसगडचे मुख्यमंत्री भूपेश बघेल यांच्यासह अनेक नेते सहभागी झाले होते. CWC बैठकीपूर्वी सोनिया गांधी यांनी ट्विटरवर लिहिले - काँग्रेस नेहमीच तेलंगाणातील लोकांच्या बाजूने उभी राहिली आहे. राज्याला प्रगतीच्या नव्या टप्प्यावर नेण्याची हीच वेळ आहे. तेलंगणा आणि देशाच्या विकासाचा नवा अध्याय लिहिण्यासाठी काँग्रेस कार्यकारिणी सज्ज झाली आहे. तेलंगणात काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीवरून सत्ताधारी बीआरएस आणि काँग्रेसमध्ये पोस्टर वॉर झाले. हैदराबादमध्ये मुख्यमंत्री के चंद्रशेखर राव यांच्या चित्रासह 'बुक माय सीएम' आणि '30 टक्के कमिशन' अशा घोषणा असलेले पोस्टर्स लावण्यात आले आहेत. अनेक ठिकाणी काँग्रेसच्या विरोधात पोस्टर्स आणि बॅनरही लावण्यात आले आहेत. एका पोस्टरमध्ये लिहिले आहे - 2004 ते 2014 पर्यंत सत्तेत असताना काँग्रेसने अनुसूचित जाती वर्गीकरणाच्या नावाखाली दलितांना मूर्ख बनवले होते. काँग्रेसला पुन्हा एकदा गॅरंटीच्या नावाखाली हे करायचे आहे. CWC बैठकीच्या दुसऱ्या दिवशी, रविवारी, 17 सप्टेंबर रोजी काँग्रेस पत्रकार परिषद घेणार आहे. 17 सप्टेंबर हा तेलंगाणा दिवस देखील आहे. याबाबत काँग्रेसने म्हटले की, मोदी आणि तेलंगाणा सरकार या दोन्ही एका नाण्याच्या दोन बाजू आहेत. दोघेही भ्रष्ट आहेत.

### भोपाळमध्ये होणारी सभा रद्द

» काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीदरम्यान, मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री कमलनाथ यांनी भोपाळमध्ये ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात होणारी इंडिया आघाडीची रॅली रद्द केल्याची माहिती दिली. ही रॅली रद्द करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. बुधवार, 13 सप्टेंबर रोजी दिल्लीत झालेल्या INDIA ALLIANCE च्या समन्वय समितीच्या बैठकीत देशातील विविध राज्यांमध्ये मोर्चे काढण्याचा निर्णय घेण्यात आला.

### बीआरएस आणि काँग्रेसमध्ये पोस्टर वॉर

» तेलंगाणात काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीवरून सत्ताधारी बीआरएस आणि काँग्रेसमध्ये पोस्टर वॉर झाले. हैदराबादमध्ये मुख्यमंत्री के चंद्रशेखर राव यांच्या चित्रासह 'बुक माय सीएम' आणि '30 टक्के कमिशन' अशा घोषणा असलेले पोस्टर्स लावण्यात आले आहेत. अनेक ठिकाणी काँग्रेसच्या विरोधात पोस्टर्स आणि बॅनरही लावण्यात आले आहेत. एका पोस्टरमध्ये लिहिले आहे - 2004 ते 2014 पर्यंत सत्तेत असताना काँग्रेसने अनुसूचित जाती वर्गीकरणाच्या नावाखाली दलितांना मूर्ख बनवले होते.

गेल्या महिन्यात 20 ऑगस्ट रोजी मल्लिकार्जुन खरगे यांनी CWC ची घोषणा केली होती. यानंतरची ही पहिलीच बैठक आहे. या वर्षाच्या अखेरीस मध्य प्रदेश, छत्तीसगड, राजस्थान, तेलंगणा आणि मिझोराममध्ये विधानसभा निवडणुका आहेत. मध्य प्रदेशात भाजप, छत्तीसगड-राजस्थानमध्ये काँग्रेस, तेलंगणात बीआरएस आणि मिझोराममध्ये मिझो नॅशनल फ्रंट-भाजपचे सरकार आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी 20 ऑगस्ट रोजी काँग्रेस कार्यकारिणीची (CWC) घोषणा केली होती.

# मनुस्मृती लागू झाल्यास 95% लोक गुलाम होतील!

## » संविधान नष्ट करणाऱ्या शक्तींपासून सावध राहा : सिद्धरामय्या

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**संविधानाला विरोध करणाऱ्यांपासून सावध राहण्याची गरज असल्याचे कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी म्हटले आहे. या अशा शक्ती आहेत ज्यांना राज्यघटना नष्ट करून मनुस्मृतीची पुन्हा अंमलबजावणी करायची आहे. सिद्धरामय्या म्हणाले की, मनुस्मृतीची अंमलबजावणी करणे म्हणजे या देशातील 95% लोक गुलाम म्हणून जगतील.**



या व्यवस्थेविरुद्ध लोकशाही आणि संविधान ही उत्तम ढाल आहे. शुक्रवार, 15 सप्टेंबर रोजी आंतरराष्ट्रीय लोकशाही दिनानिमित्त संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन झाले. हा कार्यक्रम बेंगळुरू विधान सौधा येथे झाला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांसह सुमारे दीड कोटी लोक सहभागी झाले होते. सिद्धरामय्या यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की, किमान संविधानाची प्रास्ताविक वाचून दाखवा आणि विरोधी शक्तींनी त्याची तत्त्वे नष्ट करण्याचा कोणताही प्रयत्न यशस्वी होऊ देऊ नका. लोकशाही टिकली तर आपण टिकू. संविधान टिकले तर लोकशाही टिकेल. त्यामुळे लोकशाही आणि संविधानाचे रक्षण करणे हे या देशातील प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. कर्नाटक सरकारने सर्व शाळांसाठी प्रस्तावना वाचन अनिवार्य केले आहे. सिद्धरामय्या म्हणाले- मुलांना आपल्या राज्यघटनेच्या साराची जाणीव करून देण्यासाठी आम्ही सर्व शाळांमध्ये प्रस्तावनेचे वाचन राबवत आहोत.

### शाळांमध्ये प्रस्तावना वाचणे अनिवार्य

» सिद्धरामय्या यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की, किमान संविधानाची प्रास्ताविक वाचून दाखवा आणि विरोधी शक्तींनी त्याची तत्त्वे नष्ट करण्याचा कोणताही प्रयत्न यशस्वी होऊ देऊ नका. लोकशाही टिकली तर आपण टिकू. संविधान टिकले तर लोकशाही टिकेल. त्यामुळे लोकशाही आणि संविधानाचे रक्षण करणे हे या देशातील प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. कर्नाटक सरकारने सर्व शाळांसाठी प्रस्तावना वाचन अनिवार्य केले आहे. सिद्धरामय्या म्हणाले- मुलांना आपल्या राज्यघटनेच्या साराची जाणीव करून देण्यासाठी आम्ही सर्व शाळांमध्ये प्रस्तावनेचे वाचन राबवत आहोत.



# रणबीर आणि आलिया न्यूयॉर्कहून परतले



शुक्रवारी मुंबई विमानतळावर अनेक सेलिब्रिटी दिसले. बॉलिवूड अभिनेत्री आलिया भट्टही पती रणबीर कपूरसोबत स्टायलिश लूकमध्ये विमानतळावर दिसली. याशिवाय दिग्गज अभिनेते अनिल कपूर, सोनू सूद, शमिता शेट्टी आणि नुसरत भरुचा हे देखील स्पॉट झाले होते. अलीकडच्या रॉकी और रानी की प्रेम कहानी आणि हॉलिवूड रिलीज हार्ट ऑफ स्टोनच्या यशानंतर आलिया सध्या रणबीरसोबत न्यूयॉर्कला सुट्टीवर गेली होती. या काळातील अनेक व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर समोर आले आहेत. आता दोघेही मुंबईला परतले आहेत. शुक्रवारी हे जोडपे मुंबई विमानतळावर स्पॉट झाले. जिथे दोघेही खूप मस्त आणि कम्फर्टेबल लूकमध्ये दिसले आलिया व्हाईट ओव्हरसाईज टी-शर्ट आणि ब्लॅक पँटमध्ये दिसली. काळ्या गॉगल आणि पांढऱ्या शूजने तिने हा लूक पूर्ण केला. तर रणबीर ऑल ब्लू ट्रॅक सूटमध्ये दिसला होता, ज्यामध्ये तो खूपच सुंदर दिसत होता. त्याला पाहताच चाहत्यांनी त्याला चारही बाजूंनी घेरले. त्यानंतर दोघांनीही विमानतळावर चाहत्यांसमोर जोरदार पोज दिल्या. ६६ वर्षीय अनिल बॉलिवूड इंडस्ट्रीतील सर्वात फिट अभिनेत्यांपैकी एक आहे. विमानतळावर तो खूपच देखणा आणि तरुण दिसत होता. चाहत्यांना पाहून अभिनेत्याने त्यांना नमस्कार केला आणि त्यांच्यासोबत सेल्फीही घेतला. नुसरत भरुचाही विमानतळावर स्टायलिश लूकमध्ये दिसली. तिच्या लूकबद्दल बोलायचे झाले तर तिने काळ्या स्वेट शर्टसोबत गुलाबी ट्राउजर घातला होता. आत गेल्यानंतर पापाराझींसाठी हसतमुख पोझ दिली.

## आर्यनने शाहरुख खानला केले मोटिव्हेट

शाहरुख खान आणि त्याच्या नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'जवान' चित्रपटाच्या टीमने नुकतीच मुंबईत एक गेट टुगेदर आयोजित केले होते. यावेळी चित्रपटातील कलाकार आणि क्रूचे सर्व सदस्य एकत्र दिसले. या कार्यक्रमात शाहरुखने तो ब्रेकवर होता तेव्हा त्याला चित्रपटांमध्ये परतण्यास कोणी प्रवृत्त केले हे सांगितले. 'झिरो' चित्रपट फ्लॉप झाल्यानंतर शाहरुखने 2019 मध्ये 3 वर्षांचा ब्रेक घेतला होता. या कार्यक्रमात शाहरुख म्हणाला, 'मी खूप नर्व्हस होतो कारण मी इतकी वर्षे काम केले नाही. तीन वर्षांनंतर चित्रपटाच्या सेटवर परतणे माझ्यासाठी पूर्णपणे नवीनच होते. त्यावेळी माझा मुलगा आर्यन मला म्हणाला – जेव्हा आम्ही मोठे होत होतो तेव्हा तुमचे स्टारडम काय असते हे आम्हाला माहिती होते.. तुमचे स्टारडम काय आहे हे सुहानालाही माहिती होते. पण या छोट्याला (अबराम खान) फक्त तुम्ही स्टार आहात हे माहिती आहे, त्याला तुमचे स्टारडम कधीच जाणवले नाही. त्यामुळे पुढील 5 चित्रपटांसाठी एवढी मेहनत करा की त्याला हे जाणवेल. या कार्यक्रमात शाहरुखने असेही सांगितले की, तो गेल्या 29 वर्षांपासून चित्रपट यशस्वी करण्यासाठी खूप मेहनत घेत आहे.

## नुसरतसह 17 सेलिब्रिटींची ईडी चौकशी



ईडी 5,000 कोटी रुपयांच्या मनी लॉंड्रिंग प्रकरणात दुबईतून ऑनलाइन सट्टेबाजी ॲप चालवणारा सौरभ चंद्राकर आणि त्याचा व्यवसाय भागीदार रवी उप्पल यांची चौकशी करत आहे. आता या प्रकरणात टायगर श्रॉफ, नुसरत भरुचा, सुखविंदर सिंग, नेहा कक्कर आणि सनी लिओनसह 17 सेलिब्रिटींचीही चौकशी होऊ शकते. ईडीच्या तपासात सौरभ चंद्राकरचे फेब्रुवारीमध्ये लग्न झाले आणि त्यासाठी २०० कोटी रुपये खर्च झाल्याचे आढळून आले. हवालाच्या माध्यमातून हा पैसा इव्हेंट कंपनी आणि बॉलिवूड स्टार्सपर्यंत पोहोचला. हे अभिनेते आणि गायक या वर्षी फेब्रुवारीमध्ये महादेव बुक ॲपचे प्रवर्तक सौरभ चंद्राकर यांच्या लग्न समारंभात सहभागी झाले होते. दुबईत झालेल्या या लग्नात सौरभने 200 कोटी रुपये खर्च केले. या सर्व सेलिब्रिटींनीही यावेळी परफॉर्म केले. या प्रकरणात टायगर श्रॉफ, सनी लिओन, नुसरत भरुचा, नेहा कक्कर, आतिफ अस्लम, राहत फतेह अली खान, अली असगर, विशाल ददलानी, एली अबराम, भारती सिंग, भाग्यश्री, क्रिती खरबंदा, कृष्णा अभिषेक आणि सुखविंदर सिंग यांच्यासह अनेक सेलिब्रिटी आहेत. चौकशी केली जात आहे. छत्तीसगडचे रहिवासी सौरभ चंद्राकर आणि रवी उप्पल हे मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात वॉन्टेड आहेत. सौरभ एकेकाळी छत्तीसगडमधील भिलाई येथे ज्यूस विकायचा. ईडीच्या सूत्रांवर विश्वास ठेवला तर चंद्राकरने 18 सप्टेंबर 2022 रोजी दुबईतील 7 स्टार हॉटेलमध्ये पार्टी दिली होती. या पार्टीला काही बॉलिवूड सेलिब्रिटींनी हजेरी लावली, ज्यासाठी त्यांनी 40 कोटी रुपये आकारले.या वर्षी फेब्रुवारीमध्ये झालेल्या लग्नासाठी सौरभने आपल्या कुटुंबीयांना नागपूरहून दुबईला खासगी जेटने बोलावले होते. मुंबईहून बॉलिवूड सेलिब्रिटी, वेडिंग प्लानर, डान्सर्स आणि डेकोरेटर्सही दुबईला पोहोचले. या लग्नात या 17 सेलिब्रिटींनी परफॉर्म केले होते.गेल्या वर्षी डिसेंबरपासून सुरू असलेल्या या प्रकरणाच्या तपासात आता बॉलिवूड कनेक्शन समोर आले आहे. महादेव ऑनलाइन बेटिंग ॲप हे एक गेम ॲप आहे जे 30 केंद्रांवरून ऑपरेट केले जाते. आता त्याचे प्रवर्तक दुबईत आहेत जेथे फलंदाजी बेकायदेशीर आहे. शुक्रवारी या प्रकरणी ईडीने भोपाळ, मुंबई आणि कोलकाता येथील 417 कोटी रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे.

## शाहरूखच्या जबरा फॅनची कमाल!

बॉलिवूडचा बादशहा शाहरूख खानचा जवान चित्रपट सध्या बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ करत असल्याचे पाहायला मिळत आहे. चित्रपट रोज कमाईचे नवे विक्रम करत असल्याचे समोर येत आहेत. मात्र या चित्रपटासाठी चाहत्यांची उत्सुकतादेखील चर्चेचा विषय ठरत आहे. शाहरूखच्या अशाच एका जबरा फॅनची सध्या प्रचंड चर्चा होत आहे. शाहरूखच्या या खास चाहत्याचे नाव आहे. अनिस फारुकी. शारीरिकदृष्ट्या अपंग असलेल्या या फॅनने चक्क व्हेंटिलेटर थिएटरमध्ये नेत त्याठिकाणी जवान चित्रपटाचा आनंद लुटला आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X वर त्याने त्याबाबतचा व्हिडिओ शेअर केला असून तो व्हिडिओ सध्या प्रचंड व्हायरल होत आहे. शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये शाहरूखचा एक डायलॉग असलेला व्हिडिओ आहे. हाड डायलॉग पाहण्यासाठीच एवढा सगळा प्रपंच केल्याचे सांगत अनिस बरोबर असलेल्या एकाने हा व्हिडिओ शेअर केला आहे. सोशल मीडियावर अपलोड झाल्यापासून या व्हिडिओला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. लोक अनिसचे कौतुक करत असून, फॅन असावा तर असा, अशा प्रकारच्या प्रतिक्रियादेखील व्यक्त करत आहेत.

## अनिल कपूरने भूमीसोबत रिक्रिएट केले आयकॉनिक गाणे



अभिनेत्री अंकिता लोखंडेने अलीकडेच तिच्या गर्भधारणेच्या अफवांवर चर्चा केली. तिने अशा बातम्या चुकीच्या असल्याचे म्हटले आहे. सोशल मीडियावर बेबी बंपसोबत व्हायरल होत असलेल्या फोटोंवर अंकिताने प्रतिक्रियाही दिली. याशिवाय अभिनेत्रीने तिच्या बाळाच्या नियोजनाबाबतही चर्चा केली. खरंतर, लग्नानंतर अनेकवेळा अंकिता प्रेग्नंट असल्याच्या बातम्या येत आहेत. मात्र, या सर्व केवळ अफवा असल्याचे सिद्ध झाले आहे. अंकिताला तिच्या गरोदरपणाच्या अफवांवर विचारण्यात आले. यावर ती म्हणाली- मी काही पहिली सेलिब्रिटी नाही जी आपल्या वैयक्तिक आयुष्याबाबत अशा निराधार बातम्या ऐकत राहते. प्रत्येक सेलिब्रिटीसोबत असे घडते. ती पुढे म्हणाली- 'सर्व प्रथम, जेव्हा तुम्ही सिंगल नसता तेव्हा तुम्ही लग्न कधी करणार असा प्रश्न सतत विचारला जातो. लग्न झाले आहे, किंवा होणार आहे, अशी अटकळ बांधली जात आहे. यानंतर, जेव्हा तुमचे लग्न होते, तेव्हा बातम्या येतात की तुम्ही गर्भवती आहात किंवा तुम्हाला मुले होत नाहीत. तुमच्याबद्दल या गोष्टी सतत विचारल्या जातात आणि लिहिल्या जातात. कधी-कधी ते घटस्फोटाबाबतही बोलू लागतात, मला वाटतं हे सगळं मीडियात घडत राहतं. संवादादरम्यान अंकिताला विचारण्यात आले की अशा बातम्यांचा तिच्या वैयक्तिक आयुष्यावर परिणाम होतो का? यावर ती म्हणाली- 'मी माझ्याबद्दल अनेक मीम्स पाहिले आहेत. तिचे मॉर्फ केलेले फोटो फेक बेबी बंप दाखवतानाही पाहिले आहेत. खरे सांगायचे तर या गोष्टींचा माझ्या आयुष्यावर काहीही परिणाम होत नाही. मी त्यांच्याकडे लक्ष देत नाही, उलट अशा गोष्टी पाहून हसते. हे सर्व पाहून मला असे वाटते

# आफ्रिकेने ऑस्ट्रेलियाला 164 धावांनी हरवले!

## » राभवाने निराश झालेल्या बाबरने डोक्याला लावला हात

नवी दिल्ली | वृत्तसंस्था

**हेनरिक क्लासेनच्या स्फोटक खेळीच्या जोरावर दक्षिण आफ्रिकेने ऑस्ट्रेलियाचा 164 धावांनी पराभव केला. वनडे मालिकेतील चौथ्या सामन्यातील विजयासह 5 वनडे मालिकेत 2-2 अशी बरोबरी झाली आहे. 17 सप्टेंबर रोजी जोहान्सबर्ग येथे 5वी वनडे खेळवली जाणार आहे. सेंच्युरियनमध्ये ऑस्ट्रेलियाने नाणेफेक गमावून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या दक्षिण आफ्रिकेने 50 षटकांत 5 गडी गमावून 416 धावा केल्या. प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियन संघ 34.5 षटकांत 252 धावा करून सर्वबाद झाला. केवळ 83 चेंडूत 174 धावा करणारा दक्षिण आफ्रिकेचा हेनरिक क्लासेन सामनावीर ठरला.**







दक्षिण आफ्रिका वनडे इतिहासात सर्वाधिक 400+ धावा करणारा संघ बनला आहे. संघाने 7व्यांदा 400+ धावा केल्या आहेत. दक्षिण आफ्रिकेने भारताला सोडले मागे, टीम इंडियाने 6 वेळा वनडेमध्ये 400 हून अधिक धावा केल्या आहेत. दक्षिण आफ्रिकेकडून 5व्या क्रमांकावर खेळण्यासाठी आलेल्या हेनरिक क्लासेनने स्फोटक खेळी केली. त्याने फक्त 83 चेंडूत 209.63 च्या स्ट्राईक रेटने 174 धावा केल्या. क्लासेनच्या खेळीत 13 चौकार आणि 13 षटकारांचा समावेश होता. या सामन्यात डेव्हिड मिलर आणि हेनरिक क्लासेन यांनी झंझावाती भागीदारी केली. या दोघांनी 5व्या विकेटसाठी 94 चेंडूत 222 धावांची भागीदारी केली. या भागीदारीत मिलरने 45 चेंडूत 82 धावांचे योगदान दिले तर क्लासेनने 49 चेंडूत 129 धावांचे योगदान दिले. या भागीदारीने दक्षिण आफ्रिकेची धावसंख्या 400 च्या पुढे नेली. 50 व्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर क्लासेन मार्कस स्टॉइनिसला बळी पडला आणि दोघांमधील भागीदारी तुटली. गोलंदाजीत ऑस्ट्रेलियाकडून जोश हेझलवूडने दोन बळी घेतले. स्टॉइनिस, मायकेल नेसर आणि नॅथन एलिस यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली. 417 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या ऑस्ट्रेलियन संघाचा यष्टिरक्षक अॅलेक्स कॅरीने 77 चेंडूत 99 धावा केल्या, तरीही त्याला आपले शतक पूर्ण करता आले नाही. त्याला कागिसो रबाडाने क्विंटन डी कॉकच्या हाती झेलबाद केले. उर्वरित फलंदाज काही विशेष कामगिरी करू शकले नाहीत. दक्षिण आफ्रिकेकडून लुंगी एनगिडीने चार बळी घेतले. कागिसो रबाडाने 3 बळी घेतले. मार्को जॅनसेन आणि केशव महाराज यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली, तर ट्रॅव्हिस हेडला दुखापत झाली. रविवारी भारतीय संघ गेल्या पाच वर्षांपासून आपल्या चाहत्यांची प्रतीक्षा संपवू शकतो. कोणत्यातरी मोठ्या क्रिकेट स्पर्धेत विजेतेपदाची वाट पाहत आहे. या दिवशी कोलंबोमध्ये 16व्या आशिया कपच्या अंतिम फेरीत भारताचा सामना श्रीलंकेशी होणार आहे. 2018 मध्ये भारतीय संघाला शेवटची मोठी ट्रॉफी जिंकण्यात यश आले होते. तेव्हा यूएईमध्ये खेळल्या गेलेल्या 14व्या आशिया कपमध्ये आमच्या संघाने विजेतेपद पटकावले.

### मिलर-क्लासेनची तुफानी भागीदारी

» या सामन्यात डेव्हिड मिलर आणि हेनरिक क्लासेन यांनी झंझावाती भागीदारी केली. या दोघांनी 5व्या विकेटसाठी 94 चेंडूत 222 धावांची भागीदारी केली. या भागीदारीत मिलरने 45 चेंडूत 82 धावांचे योगदान दिले तर क्लासेनने 49 चेंडूत 129 धावांचे योगदान दिले. या भागीदारीने दक्षिण आफ्रिकेची धावसंख्या 400 च्या पुढे नेली. 50 व्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर क्लासेन मार्कस स्टॉइनिसला बळी पडला आणि दोघांमधील भागीदारी तुटली. गोलंदाजीत ऑस्ट्रेलियाकडून जोश हेझलवूडने दोन बळी घेतले. स्टॉइनिस, मायकेल नेसर आणि नॅथन एलिस यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली.

# अरुण पाडुळे स्पोर्ट्स फाऊंडेशनची 'गगनभरारी'!

## » साइराज पारखी, वेदांत बाबर यांची राष्ट्रीय खेळाडू म्हणून निवड

पिंपरी |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**अरुण पाडुळे स्पोर्ट्स फाऊंडेशनच्या साइराज नवनाथ पारखी व वेदांत वसंत बाबर यांची राष्ट्रीय खेळाडू म्हणून निवड झाली आहे. तर अनुष्का बाबर हिने युनिव्हर्सिटी स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले. नॅशनल रायफल असोसिएशन दिल्ली आयोजित पूर्व राष्ट्रीय स्पर्धा ही कलकत्ता येथील असनसोल येथे नुकतीच आयोजित करण्यात आली होती.**



या स्पर्धेत भारतातील सर्व राज्यातून विविध गटातील हजारो पिस्तुल व रायफल नेमबाजांनी सहभाग नोंदवला होता.

यामुळे पिंपरी चिंचवडच्या नावलौकिकात नेमबाजीमध्ये आता भर पडली आहे.पिंपरी चिंचवडच्या आकुर्डी येथील अरुण पाडुळे स्पोर्ट्स फौंडेशन नेमबाजी प्रशिक्षण केंद्रातील साईराज नवनाथ पारखी सब युथ गटात 400 पैकी 347 व वेदांत वसंत बाबर सब यूथ गटात 400 पैकी 349 गुण मिळवत दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत आपले स्थान निश्चित केले. खडकी येथे नुकत्याच झालेल्या युनिव्हर्सिटी स्पर्धेत अनुष्का बाबर हिने 10 मीटर पिस्तुल प्रकारात 400 पैकी 373 गुण मिळवत सुवर्णपदकाची कमाई केली. सर्व स्तरांतून या खेळाडूंचे कौतुक होत आहे.

### पिंपरी-चिंचवडचे नावलौकिक व्हावे...

» निवड झालेले सर्व खेळाडू हे अरुण पाडुळे स्पोर्ट फाऊंडेशनचे प्रमुख प्रशिक्षक अरुण पाडुळे यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करीत आहेत. आतापर्यंत त्यांच्या मार्गदर्शनाखाली 20 ते 25 राष्ट्रीय खेळाडू घडले आहेत. पाडुळे स्वतः राष्ट्रीय खेळाडू असून, पिंपरी-चिंचवडमधून नेमाबाजीत जास्तीत जास्त खेळाडू सहभागी होऊन राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय स्तरावर पिंपरी-चिंचवडचे नेमाबाजीत नाव मोठं करण्यासाठी प्रयत्नशिल आहेत.